**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०४ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

- **राष्ट्रपतींचे उद्बोधन विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी देणारे- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लोकसभेत प्रतिपादन.**
- **राज्यभरात एक लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त करणार- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
- **उद्योग विभागाच्या** MAITRI **2.0 पोर्टलचे मंत्रिमंडळ बैठकीत अनावरण**, **कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस एक वर्षाची मुदत वाढ.**

- **मागेल त्याला सौर कृषी पंप योजने'त ५२ हजार ७०५ सौर पंप बसविण्याचे उद्दीष्ट महावितरणने केले साठ दिवसात पूर्ण.**

**आता सविस्तर बातम्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी- चर्चेला उत्तर

राष्ट्रपतींचे उद्बोधन विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी देणारे आहे अस प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर चर्चेला उत्तर देताना केलं. या उद्भवनामुळे नवीन विश्वास निर्माण होणार असून जनसामान्य लोकांना प्रेरणा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 25 कोटी गरीब जनता गरिबीवर मात करून दारिद्र्य रेषेच्या बाहेर आली असल्याचे उद्गार त्यांनी काढले. पाच दशकांपर्यंत आपण 'गरीबी हटाव' असे नारे ऐकले परंतु आता प्रत्यक्षात गरीब जनता त्यावर मात करून बाहेर पडली आहे . जमिनीशी नाळ जुळलेले लोक जेव्हा, तळागाळातल्या लोकांसाठी काम करतात, परिवर्तन घडवण्यासाठी झटतात, तेव्हाच असे बदल दिसून येतात असं पंतप्रधान म्हणाले. आज सामान्य जनता सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करताना,त्यांनी विविध सरकारी योजना जसे 'हर घर जल', आवास,

इत्यादींचा आढावा घेतला  यावेळी जेम पोर्टलच्या माध्यमांना सरकारनं केलेल्या बचतीचा दाखला त्यांनी दिला.

***हमने सरकारी खरीद में भी टेक्नोलॉजी का भरपूर उपयोग किया, ट्रांसपेरेंसी लाई और जैम पोर्टल जो आज राज्य सरकारों भी उसका उपयोग कर रही है। जैम पोर्टल से जो खरीदी हुई उससे आमतौर पर जो खरीदी होती है उससे कम पैसों में खरीदी हुई और सरकार के** 1,15,000 **करोड़ रूपये की बचत हुई।***
मोदींचे संबोधन सध्या सुरु आहे.

शिवराज सिंह चौहान

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी वचनबद्ध असल्याचं सरकारन आज लोकसभेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी, २०१९ पासून सरकारन उत्पादन खर्चापेक्षा ५० टक्के नफा देऊन किमान आधारभूत किंमत दर निश्चित केले असल्याचं सांगितलं. नारळ उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनला आहे आणि नारळावर होणाऱ्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार पुरेसे उपाय करत आहे, ही समाधानाची बाब असल्याचं चौहान म्हणाले.

महाकुंभ

उत्तर प्रदेशमध्ये प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभ मेळाव्याचा आज २३ वा दिवस आहे. काल वसंत पंचमीच्या मुर्हुतावर अमृत स्नानामध्ये दोन कोटी ५७ लाख भाविक सहभागी झाले होते. आत्तापर्यंत जवळपास ३८ कोटी भाविकांनी संगमावर स्नान केलं आहे. दरम्यान, भुतान नरेश जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आज कुंभमेळ्यामध्ये सहभागी झाले असून, त्यांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यावेळी उपस्थित होते. संगमावर हनुमान मंदिरामध्ये ते पुजाअर्चा करणार आहेत. भुतान नरेश आज महाकुंभ नगरीतल्या केंद्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कुंभमेळ्याची पाहणी देखील करणार आहेत.
बावनकुळे-पत्र परिषद

महाराष्ट्रात आता प्रत्येक पाचशे मतदारांमागे कार्यकारी अधिकारी राहणार असून, याप्रमाणे राज्यभरात सुमारे एक लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी जिल्ह्यात नियुक्त करणार असून प्रत्येक ठिकाणी ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती विशेष कार्यकारी अधिकारी राज्य निवड समितीचे अध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महाराष्ट्र सरकारने विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भातील सुधारित शासन आदेश जारी केला. त्यानुसार राज्य स्तरावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे या समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्हा पातळीवर पालकमंत्री सदस्य व जिल्हाधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. आजच्या सुधारित जीआरमुळे आतापर्यंत पदावर असलेल्या विशेष कार्यकारी अधिकारीचे पद तात्काळ प्रभावाने नाहीसे होणार आहे. त्यांनी पुढे सांगितले कि -

***विशेष कार्यकारी अधिकारी ग्रामस्तरावरच्या आणि तालुका स्तरावरच्या सर्व अधिकाऱ्यांची समन्वय करणार आहे. पोलिसांशीसुद्धा समन्वय राखणार आहे.त्यामुळे या 13 पेक्षा जास्त जबाबदाऱ्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यावर येणार आहे.त्यामुळे राज्यातली एक लाख चौरण्यानव हजाराच्या वर 10 वी पास असलेले जे युवक आहे जे सामाजिक आणि मोठ्या प्रमाणावर सेवेमध्ये काम करतात त्या सर्व युवकांना आणि मोठ्या प्रमाणावर नागरिकांना आणि उत्कृष्ट काम करणाऱ्या माजी अधिकाऱ्यांना सुद्धा यामध्ये घेता येणार आहे.***

दरम्यान, सुधारित निर्णय सरकारने केला असून, आता सरकारी सेवा व सुविधांसाठी लागणारी कागदपत्रे सुलभपणे मिळतील. जेणेकरून सरकार आपल्या दारी असल्याचे दिसून येईल. विशेष कार्यकारी अधिकारी नेमताना महिला वर्गाला महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे.

राज्यस्तरीय क्रीडा-महावितरण

वीज कर्मचाऱ्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी महावितरणमध्ये दरवर्षी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. २०२४-२५ च्या स्पर्धेचे यजमानपद बारामती परिमंडलाकडे आहे. या स्पर्धेचे उद्घाटन उद्या सकाळी ९ वाजता महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते होणार आहे. क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम शनिवारी ८

फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता विद्या प्रतिष्ठाणच्या गदिमा सभागृहात संचालक (संचालन/मानव संसाधन) अरविंद भादीकर यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेत क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, टेनिक्वाईट, कॅरम, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, अॅथलेटिक्स, कॅरम आणि ब्रिज आदी २२ क्रीडा प्रकारांचा

समावेश आहे.

MAITRI 2.0

ईज ऑफ डुइंग बिझनेस धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करुन गुंतवणूकदारांना सुलभ सेवा पुरविण्यासाठी उद्योग विभागाच्या अखत्यारीत असलेल्या मैत्री कक्षाच्या नूतनीकृत MAITRI 2.0 अर्थात maitri.maharashtra.gov.in या पोर्टलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. MAITRI (Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Cell) पोर्टल उद्योग, गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभीकरणासाठी महत्वपूर्ण पाऊल आहे. पोर्टलमुळे महाराष्ट्रातील उद्योग सुलभीकरण प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग वाढणार. उद्योजक, व्यापारी आणि गुंतवणूकदार यांना अधिक सोपी आणि जलद सेवा मिळणार आहे.एकच अर्ज प्रणाली, रिअल-टाईम ट्रॅकिंग आणि डॅशबोर्ड, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित चॅटबॉट आणि ऑनलाईन सहाय्य केंद्र, इन्सेंटिव्ह कॅल्क्युलेटर,डिजिटल डॉक्युमेंट डिपॉझिटरी आणि राष्ट्रीय सिंगल विंडो सिस्टम अश्या सुविधा यात समाविष्ट आहे.

मंत्रिमंडळ निर्णय

शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्टयान किंवा कब्जेहक्कान दिलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस एक वर्षाची मुदत वाढ देण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

जीएसआय नागपूर

भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण -जीएसआय नागपूर, तर्फे 38 व्या अखिल भारतीय व्हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे . या स्पर्धा उद्या आणि परवा अर्थात ५ आणि ६ फेब्रुवारी रोजी जीएसआय कॉम्प्लेक्स सेमिनरी हिल्स इथं आयोजित करण्यात येणार असून एकूण सात संघांच्या माध्यमातून 80 खेळाडू सहभागी होत आहे. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल आणि महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संस्थेचे अध्यक्ष विजय डांगरे हे उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहणार आहे.

सौर कृषी पंप

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारन निश्चित केलेल्या शंभर दिवसांच्या उद्दीष्टांपैकी ‘मागेल त्याला सौर कृषी पंप योजने’त ५२ हजार सातशे ५ सौर पंप बसविण्याचे उद्दीष्ट महावितरणने साठ दिवसात पूर्ण केले, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. ६ डिसेंबर रोजी ९७ हजार दोनशे ९५ सौर कृषी पंप बसविण्यात आले होते. त्यानंतर ४ फेब्रुवारीपर्यंत महावितरणने ५३ हजार ९ सौर कृषी पंप बसविले. त्यामुळे ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ योजनेत आतापर्यंत बसविलेल्या पंपांची संख्या १ लाख ५० हजार ३०४ झाली आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप या राज्य सरकारच्या योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के आणि राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते.

हवामान

विदर्भातील जिल्हयांमध्ये गेल्या काही दिवसांपासून किमान आणि कमाल तापमानात सातत्यान वाढ जाणवत आहे. आज अमरावती जिल्हयात सर्वात कमी 18 अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदवण्यात आले तर अकोला जिल्हयात 37 पूर्णांक 1 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. नागपुरात 18 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस इतके किमान तर 35 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली.

*****